# प्रेस नोट दिनांक ०७/०६/२०१९
# चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
## युवॉन आयटी, खराडी येथे सुरक्षा गार्डला सुरक्षे संबधाने मार्गदर्शन केले बाबत.

दिनांक ०६/०६/१९ रोजी २०.०० वा. ते २०.३० वा. चे दरम्यान पोलीस ठाणेकडील पोना. २६२३, अनिरुध्द जायभाये व पोशि. ७६७९, पांडुरंग नाणेकर यांनी युवॉन आयटी, खराडी, पुणे येथे मे. ट्रीग गार्ड सिक्युरिटी एजन्सीचे गार्डची सुरक्षा संबधाने मिटींग घेतली आहे.

सदर मिटींगमध्ये सध्या दहशतवादी संघटनांकडुन होत असलेल्या हिंसक घटनांबाबत करावयाचे उपयायोजनांची माहिती देण्यात आली आहे. डयुटीवर असताना सुरक्षा रक्षक यांनी चौफेर लक्ष ठेवुन अति संवेदनशिलतेने व अलर्ट राहुन डयुटी करणे, संशयीत व्यक्तीचे हालचालींवर नजर ठेवुन जवळचे पोलीस ठाणे, चौकीस किंवा नियंत्रण कक्षास तात्काळ माहिती देणे. संशयीत वस्तु मिळुन आल्यास त्याबाबतही पोलीसांना तात्काळ खबर देवुन पोलीस घटनास्थळी पोहचेपर्यंत तेथे निगराणी करणे.

ज्या आस्थापनांच्या ठिकाणी डयुटी देण्यात आलेली आहे, तेथील मालमत्तेचे व जिवीताचे संरक्षण करणेसाठी कटिबध्द राहुन सर्तकतेने डयुटी बजावणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. अतिरेकी संघटनाकडुन हल्यासाठी वापरण्यात येणारी संशयीत वाहने, पोलीसांचे गणवेशामध्ये येवुन हल्ला करणे, भिका□ांचे वेशात राहुन टेहळणी करुन हल्याची शक्यता असणे अशा संभाव्य गोष्टींवर लक्ष ठेवणेसाठी सुचना दिलेल्या आहेत.

सदर मिटींगसाठी सिक्युरिटी एजन्सीचे अधिकारी व सुरक्षा गार्ड असे एकुण ७० ते ८० चा समुदाय हजर होता.



